**नि.दि.मु.क्र.१७/२०१४ मधील नि.८० वरील आदेश**
**CNRNo.MHST16000084-2014**
**(निवृत्ती आबाजी भिलारे वि. एकनाथ कृष्णा भिलारे वगैरे)**

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र.४ चे वारसांचे बाबत दाव्यात दुरुस्ती करणेसाठी केला आहे.

२. वादीचे अर्जातील कथन थोडक्यात असे आहे की, वादीने सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुद्ध कब्जा व निरंतर ताकीद मिळण्याकरिता दाखल केला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.४ शंकर कृष्णा भिलारे हे दिनांक २६.१०.२०२३ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र.४ यांना हिंदु वारस कायदयाप्रमाणे असणारे वारस अभिलेखावर येणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र.४ यास खालीलप्रमाणे कायदेशीर वारस आहेत. त्यांना रेकॉर्डवर घेण्यास व त्याप्रमाणे सरनाम्यात दुरुस्ती होवून मिळावी ही विनंती केली आहे.

प्रतिवादी क्र.४ शंकर कृष्णा भिलारे यांच्या नावास कंस करण्यात यावा त्याचे खाली मयत असे लिहण्यात यावे व खालीलप्रमाणे वारसांची नावे लिहण्यात यावीत.

"४अ) सिंधु शंकर भिलारे
उ.वय-६० वर्षे, धंदा-घरकाम,
४ब) राहूल शंकर भिलारे
उ.वय-४० वर्षे, धंदा-शेती,
४क) अजय शंकर भिलारे
उ.वय-३५ वर्षे, धंदा-शेती,
४अ ते ४क तिघेही रा. लोहारे, ता.वाई, जि.सातारा.
४ड) अश्विनी योगेश सोनावणे
उ.वय-३७ वर्षे, धंदा-घरकाम,
रा. ता.वाई, जि. सातारा "

३. प्रतिवादींनी सदर अर्जावर नि.८४ वर म्हणणे दाखल केले असून अर्जातील कथने अमान्य केली आहेत. त्यांनी असे कथन केले आहे की, वादीने अर्जामध्ये प्रतिवादी क्र.४ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास व झालेल्या विलंबाबाबत तसेच अबेटमेंटबाबत जी कारणे दिली आहेत ती पुर्णपणे खोटी आहेत. प्रतिवादीना सुमारे ६ महिने पेक्षा जास्त काळ मयत होवून झाला आहे. वादी हे लोहारे गावातीलच राहवाशी असुन प्रतिवादी क्र.४ हा मयत असल्याची माहीती त्यांना आहे. अर्जात नमुद केलेला मजकुर चुकीचा आहे. दाव्याचे कामी वादी यांचा संपुर्ण पुरावा झालेला आहे व असे असतानाही जाणीवपुर्वक प्रतिवादी क्र.४ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर न घेतल्याने तसेच त्यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल न केल्याने वादीचा निशाणी ७६, ७८ व ८० वरील अर्ज न्यायाच्या दृष्टीने रद्द बातल करण्यात यावेत अशी विनंती केली आहे.

४. वादीचा अर्ज व दाव्यातील कथने तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा निरंतर ताकीद मिळण्याकरिता दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी क्र.४ हे मयत झाले आहेत. तसेच वादीला प्रतिवादी क्र.४ चे वारसांविरुध्द दावा चालविण्याचा अधिकार आहे. वादीने प्रतिवादी क्र.४ मयत असल्याबाबत निशाणी ७५ वर मृत्युचा दाखला दाखल केला आहे. सदर दाखल्यावरुन असे दिसुन येते की प्रतिवादी क्र.४ हे दिनांक २६.१०.२०२३ रोजी मयत झाले आहेत. वादीने

मागितलेली दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच दाव्याचे स्वरुपातही बदल होणार नाही. याउलट दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्याकरीता सदरची दुरुस्ती मंजूर करणे योग्य होणार आहे. सबब दाव्याचे स्वरुप विचारात घेता व दाव्याचे अंतिम निराकरण होण्याकरीता अर्ज मंजूर करणे योग्य होईल. करिता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

<u>आ दे श</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने अर्जात नमुद केलेली दुरुस्ती नियमानुसार विहीत वेळेत करावी व दुरुस्त प्रत १४ दिवसांचे आत दाखल करावी.

ठिकाण - वाई.
दिनांक - १६.०७.२०२४

(सी. व्ही. शिरसाट)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.